**टंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी उपसण्याकरिता भाडयाने घेतलेल्या विद्युत पंप / ऑईल इंजिनच्या दराबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रं.टंचाई-३०९८/प्र.क्र.१९७/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. १९ जानेवारी १९९९.**

**वाचा :-** १) महाराष्ट्र पिण्याचे पाणी पुरवठा अधिग्रहण अधिनियम १९८३.
२) महाराष्ट्र पिण्याचे पाणी पुरवठा अधिग्रहण (सुधारणा) अधिनियम १९९२.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं. टंचाई- १०९५/ प्र.क्र.१३५/४३ दि. ६ एप्रिल १९९५.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भ क्रं. १ व २ अन्वये टंचाईच्या कालावधीत कोणत्याही विहिरीमधून, तलावातून किंवा अन्य जलाशयातून पिण्याच्या पाण्याचे अधिग्रहण करण्याचे अधिकार जिल्हयाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. संदर्भ क्रं.३ अन्वये पिण्याच्या पाण्यासाठी खाजगी विहिर अधिग्रहीत केल्यानंतर विहिर मालकास दयावयाच्या मोबदल्याच्या दरामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या शासन निर्णयान्वये अधिग्रहीत विहिरीच्या मालकास रु. १००/- प्रतिदिन या दराने मोबदला निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये विहिर मालकाच्या पाणी उपसण्यासाठी वापरलेल्या साधनसामग्रीच्या दराचाही समावेश आहे. ज्याठिकाणी अधिग्रहीत खाजगी विहिरीवर किंवा सार्वजनिक जलाशयावर पाणी उपसण्याचे साधन नाही, त्या ठिकाणी टँकर्स भरण्यासाठी भाडयाने ऑईलइंजिन / विद्युतपंप घ्यावे लागतात. अशा भाडयाने घेतलेल्या ऑईल इंजिन / विद्युतपंप मालकास काय दराने भाडे दयावे अशी विचारणा जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**परिपत्रक :-**

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ अधिग्रहीत केलेल्या खाजगी विहिरीवर पाणी उपसण्यासाठी मालकाचे साधन उपलब्ध नसल्यास टँकर भरण्यासाठी भाडयाने घेतलेल्या ऑईल इंजिन / विद्युतपंपाचा खर्च विहिर मालकास देय असलेल्या रु. १००/- प्रतिदिन मोबदल्यामधून भागविण्यात यावा. सार्वजनिक विहिरी/जलशयामधून टँकर भरण्यासाठी भाडयाने घेतलेल्या ऑईल इंजिन/विद्युतपंपावर होणारा खर्च देखभाल व दुरुस्ती निधीतून करण्यात यावा.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

विभागीय आयुक्त, (सर्व)
जिल्हाधिकारी, (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, (सर्व)
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
महालेखापाल-१/२ (लेखा व परिक्षा) मुंबई/नागपूर.
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.